Lokmat

Printed from Lokmat epaper, Published on Sunday, April 01, 2012, Lokmat Hello Solapur Page No. 2

# भारती विद्यापीठाच्या २५ विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट



⊞ Enlarge Image

भारती विद्यापीठ अभिजित कदम व्यवस्थापन शाखेच्या प्लेसमेंट विभागामार्फत २५ विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट झाले. त्यांच्यासमवेत डावीकडून प्रा. अविनाश ढवण, प्रा. कोठारी, प्रा. संभाजी सावंत, प्रा. नदाफ, प्रा. प्रिया इराबत्ती. सोलापूर। दि. ३१ (वाणिज्य प्रतिनिधी)

शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये भारती विद्यापीठ अभिजित कदम व्यवस्थापन शाखेच्या प्लेसमेंट सेलमार्फत २५ विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट झाले. विद्यापीठात स्वतंत्र प्लेसमेंट सेल प्रा. अविनाश ढवण यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यशाळा घेतल्या जातात. यासाठी बाहेरून तज्ज्ञ मंडळींना बोलावले जाते.

आजच्या मंदीच्या काळात भारती विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेलने २५ विद्यार्थ्यांना नोकरी देण्यात यश मिळविले आहे. यंदाच्या वर्षी एकूण १४ कंपन्यांनी प्लेसमेंट इंटरव्हयू घेतले. यामध्ये अँक्सिस बँक, व्हेचुरा,डीएसएस वर्ल्ड, एनआयआयटी, आयबीपीएस, सुनील मंत्री ग्रुप, गती लॉजिस्टिक्स, इंडिया इंफोलाईन, व्हाईट कोड अशा अनेक कंपन्यांमध्ये ही प्लेसमेंट करण्यात आली. यासाठी संचालक डॉ. संभाजी सावंत, प्रा. डॉ. प्रिया इराबत्ती, प्रा. जानवाडकर, प्रा. कोठारी, प्रा. शिवगंगा यांनी परिश्रम घेतले.